# राबोडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ २४२ /२०२५ दि. ०४/११/२०२५

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** राबोडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत श्रमजीवी संघटनेचे अध्यक्ष श्री. रामभाऊ वारणा आणि पदाधिकारी हे दिनांक ०५/११/२०२५ सकाळी ११.०० वा. पासुन ते दिनांक ०७/११/२०२५ रोजी १७.०० वा पावेतो ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मक्लेश आंदोलन करणार असुन दिनांक ०७/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता हजारो कातकरी व आदिवासी बांधवांसह धडक मोर्चाचे आयोजन केलेले आहे. त्यामुळे सदर परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या साईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** टेंभी नाका येथुन कोर्टनाक्याकडुन क्रिकनाका, कळवा, नवीमुंबई कडे हॉटेल पव्हेलीयन कडुन झोन १ कार्यालय रोड ने जाणाऱ्या सर्व वाहनांना **कोर्टनाका चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** सदरची वाहने कोर्टनाका येथुन उजवे वळण घेवुन पोलीस स्कुल येथुन डावे वळण घेवुन पारीख कट मागे इच्छित स्थळी वाहने जातील.

**ब)** सदरची वाहने कोर्टनाका येथुन डावे वळण घेवुन जी.पी.ओ मार्गे इच्छित स्थळी वाहने जातील.

**सदरची अधिसुचना दिनांक ०५/११/२०२५ रोजी सकाळी ०८:०० वा. पासून मोर्चा संपेपर्यत अंमलात राहील.**

सदरची वाहतुक अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागु राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक,ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे,

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी.नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी, वाहतूक उपविभाग ठाणे.